ISSN 2319-8648
UGC Approved Journal
Sr. No. 64310
Impact Factor - 2.143
Peer-Reviewed
Indexed (IIJIF)

Arts, Commerce & Science College
Shreewardhan

# Current Global Reviewer

Estd. June 1979

*Issue I, Volume I*

*Special Issue*

*on*

"Above Self... Above Politics"

# Contemporary Social and Educational Issues in India

***On the Occasion of Centenary Celebration of Gokhale Education Society***

***(20th March, 2018)***

***by***

## Gokhale Education Society

***Mumbai Zone, Mumbai***



**Editor in Chief**
**Mr. Arun Godam**

**Speical Editor**
**Dr. Mrs. S. V. Sant**

**Co-Editor**
**Dr. R. P. Deshpande**
**Mr.P. K. Mishra**

**Co-Edior**
**Dr. S. B. Karande**
**Mr. S. R. Uchale**

# १४. गोखले एज्युकेशन सोसायटीच्या शतकी वाटचालीवर एक नजर.....

प्रा. किशोर लहारे

*इतिहास विभाग, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, श्रीवर्धन. जि. रायगड.*

Arts Commerce & Science College Shreewardhan

---

गोखले एज्युकेशन सोसायटीची स्थापना प्रि. टि. ए. कुलकर्णी यांनी नाशिक येथे इ.स. १९१८ मध्ये केली. ही संस्था आज या वर्षी शतक महोत्सवी वर्ष साजरे करत आहे. आधुनिक महाराष्ट्रात ज्या काही हाताच्या बोटावर मोजता येतील अशा नामांकित संस्था आहेत. अशा शिक्षण संस्थांमधे या संस्थेची गणना केली जाते. आज ही संस्था राज्यातीलच नव्हे तर देशातील एक नामांकित संस्था असून या संस्थेने आपल्या राज्याला व देशाला उच्च शिक्षणात खुप मोठे योगदान दिलेले आहे. आज राज्यात या संस्थेचा मोठा विस्तार झालेला दिसून येत आहे. अगदी केजी टू पीजी आणि आर्टस, कॉमर्स, सायन्स, लॉ, इंजिनियरिंग, कृषी, मॅनेजमेंट इत्यादी विविध शाखांचे उच्च शिक्षण दिले जात आहे. संस्थेचे सचिव डॉ. एम. एस. गोसावी, अध्यक्ष, प्राचार्य डॉ. एस. बी. पंडित, प्राचार्य डॉ. दिप्ती देशपांडे आणि दिग्गज सहकाऱ्यांनीशी संस्थेची दमदार वाटचाल सुरु असून आता ही संस्था बाहेरच्या देशांतही भारतीय ज्ञान शाखांचा विस्तार करण्याच्या तयारीत आहे. या संस्थेच्या पदाधिकारी व नेत्यांनी नेहमीच दुरदृष्टी ठेऊन वाटचाल केली आहे. ही संस्था राज्यातील पहिली आय. एस. ओ. सर्टिफाईड संस्था असून या संस्थेत आज वडील हजारो शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आपले योगदान देत आहे, तर लाखो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

संस्थेचे सचिव, डॉ. एम. एस. गोसावी व अध्यक्ष, प्राचार्य डॉ. एस. बी. पंडित यांच्या सारखी दुरदृष्टी असणारे संस्थाचालक या संस्थेला लाभल्याने ही संस्था इतर संस्थापेक्षा निश्चीतच वेगळी व उठून दिसते. या संस्थेच्या दुरदृष्टी मुळेच स्वतंत्र भारताला सुमारे तीन हजार उत्कृष्ट व्यवस्थापक सर्वप्रथम लाभले. स्वतंत्र भारताच्या वाटचालीत या संस्थेचे असंख्य विद्यार्थी आज मोठ–मोठया पदांवर कार्यरत असून अनेकजण उच्च शिक्षण घेऊन परदेशातही आपले योगदान देताना दिसून येतात.

शिवाय या संस्थेने नेहमीच शहरी शिक्षणाबरोबरच अत्यंत आदिवासी व ग्रमीण भागात मोठे योगदान दिले आहे. आगदी ठाणे जिल्ह्यातील जव्हार, पालघर मधिल कोसबाड, तलासरी, वाडा, बोर्डी सारख्या आदिवासी भागात मोठे योगदान दिलेले आहे. त्याचप्रमाणे मुंबई आणि नाशिक सारख्या मोठमोठया शहरांमधे सुध्दा या संस्थेने मोठे नाव

कमावले असल्याने अनेक विद्यार्थी व पालकांचा ओढा सतत या संस्थेच्या शिक्षण देणाऱ्या शाखांकडे असतो. अनेक व्यवसायीक व उद्योजक या संस्थेत शिक्षण घेतलेल्या तरुणांनाच प्राधान्य देतात.

प्रिं. टि. ए. कुलकर्णी यांची ऐतिहासिक कामगिरी आणि दुरदृष्टी या मुळेच आज संस्थेचा मोठा नाव लौकीक झालेला दिसून येतो. प्रिं. टि. ए. कुलकर्णी यांनी त्या काळी सरकारी नोकरी सोडून १९१२ मध्ये मुंबईच्या गिरगांवात न्यू. इंग्लीश स्कूल शाळा सुरु केली. त्या वेळी शाळेतील शिक्षण म्हणजे केवळ पांडीत्य, पुस्तके, घोकंपट्टी त्यांना मान्य नव्हती तर विद्यार्थ्यांना व्यवसायीक, औद्योगिक, हस्त, लोहार, सुतारकाम या सारख्या व्यावसायीक शिक्षणाची सोय त्यांनी करुन दिली. विद्यार्थ्यांना व्याख्याने, साहित्य संमेलने, नेतृत्वगुण, व्यायाम इ. गुण वैशिष्टयांचे धडे दिले. ही शाळा त्यांनी जवळपास सहा वर्षे चालवल्याचे सांगतात. आणि १९ फेब्रुवारी १९१८ मध्ये त्यांनी थोर नेते नामदार गोपाळकृष्ण गोखले यांच्या स्मरणार्थ गोखले एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली व या संस्थेत न्यू इंग्लिश स्कूल ही शाळा विलीन केली. आजही डी.जी.टी. हायस्कूल या नावाने ते ओळखले जाते टि. ए. कुलकर्णी यांना सर्व शिक्षक, कर्मचारी 'काकासाहेब' या नावाने हाक मारत असत. शिक्षण संस्था या फक्त पुस्तकी ज्ञान देणाऱ्या निर्जिव पाठशाळा नसून विद्यार्थ्यांच्या रुपाने समाजाला उपयुक्त घटक, जबाबदार नागरिक व कालांतराने नेतृत्व पुरविणाऱ्या जिवंत संस्था होऊ शकतात. हे काकासाहेबांनी दाखवून दिले.

शिक्षकांनीच काढलेली व चालविलेली शिक्षण संस्था, हे या संस्थेचे एक महत्वाचे वैशष्टय आहे. त्याकाळी अतिशय कमी पगारावर काम करणारी डी. जी. मुल्हेरकर, श्री. संझगिरी, श्री. लाड श्री. सावे, श्री. चित्रे, श्री. भिसे, आचार्य दोंदे या सारखी माणसे काकासाहेबांना सहकारी म्हणून भेटत गेली. त्यांनीही त्या सर्व कर्मचाऱ्यांना संस्थेचे आजीव सेवक केले. त्यातूनच गोखले एज्युकेशन सोसायटीच्या रोपटयाचा कल्पवृक्ष झाला. काही काळाने परळ येथे शाळा काढली, त्या काळी खेडया पाडयातून आलेले गिरणी कामगार शाळेची फी भरण्याची ऐपत नसणारे पालक त्यामुळे शाळा चालवणे फारच अवघड होते. म्हणून काकांनी त्यावेळी गिरणी मालकांना पत्र लिहून आर्थिक मदतीचे आवाहन केले. व तशी आर्थिक मदत काही प्रमाणात मिळाली. १९२० मधे जेव्हा आचार्य दादासाहेब दोंदे संस्थेत काम करण्यास दाखल झाले, त्यावेळी १९२०मधेच बोर्डी येथे काकांच्या मार्गदर्शनाखाली शाळा काढली व श्री आचार्य भिसे यांच्यावर तेथिल जबाबदारी सोपविण्यात आली व तेही आयुष्यभर बोर्डितच कार्यरत राहीले.

काकांनी सन १९२४ ला उत्तर महाराष्ट्रातील ग्रामिण भागातील महाविद्यालय सुरु करण्याचे ठरविले. त्या काळी नाशिकमधे महाविद्यालय चालविणे अवघड होते. कारण आर्थिक दृष्टया ते परवडणारे नव्हते पुण्या–मुंबईनंतर

इतरत्र महाविद्यालय चालविणे शिक्षण तज्ञांच्या दृष्टीने योग्य नव्हते. असे असले तरी काकासाहेबांनी नाशिक पासून चार मैल अंतरावर सत्तर एकर जागा घेऊन महाविद्यालय सुरु केले. महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून ते आता काम बघू लागले. त्या काळी त्यांनी निरनिराळी झाडे लावली, सुंदर बाग लावली, जनावरे बाळगून त्यांची जोपासना केली. शेतकऱ्यांना जनावरांची कशी काळजी घ्यायची याचे धडे दिले. नाशिकला महाविद्यालय काढताना अनेक अडचणी आल्या, त्यातल्या त्यात आर्थिक अडचण फार मोठी होती. ही आर्थिक अडचण काही प्रमाणात हंसराज प्रागजी ठाकरसी यांच्याकडून काही प्रमाणात सोडविण्यास मदत झाली. काकासाहेबांना १९२० मधे मुंबई विद्यापीठाचे सिनेट सदस्य म्हणून निवडण्यात आले. व १९२९ मधे सिनेटची मुदत संपली त्यानंतर सन १९३० पासून ते १९४६ पर्यंत ते पुन्हा सिनेट सदस्य होते. त्यामुळे महाविद्यालयाच्या प्रगतीसाठी या पदाचा फार मोठया प्रमाणात उपयोग करुन घेता आला.

काकासाहेबांनी सन १९४८ मध्ये महाविद्यालयातून प्राचार्य पदावरुन निवृत्त झाले. व या पुढे त्यांनी आपला मुक्काम मुंबईला हलवला. व ते शेवट पर्यंत मुंबईतच होते. आयुष्याच्या शेवटापर्यत ते संस्थेचे अध्यक्ष होते. या कालावधीत संस्थेची फारच मोठी भरभराट झाली. शैक्षणिक, सामाजिक, औद्योगिक कार्यात ते सतत मार्गदर्शकाच्याच भुमिकेत होते.

गोखले एज्युकेशन संस्थेचे सध्याचे सचिव डॉ. मो. स. गोसावी सर वयाच्या अगदी २३ व्या वर्षी म्हणजे सन १९५८ मधे बी. वाय. के. महाविद्यालयाचे संस्थापक प्राचार्य झाले. सरांनी गोखले एज्युकेशन सोसायटीत आपल्या कार्याला सुरुवात केली, त्या गोष्टीला आज ६० वर्षे पूर्ण झाली आहेत. प्रिं. टि. ए. कुलकर्णी यांनी लावलेल्या वटवृक्षाचा आज जो विस्तार झाला आहे त्याचे श्रेय डॉ. गोसावी यांना जाते. संस्थेत विद्यार्थी शिकले पाहिजेत पण ते केवळ कारकुणी किंवा सरकारी नोकरी साठी नव्हे, तर त्यांच्यातून उद्योजक निर्माण झाले पाहिजेत. त्यासाठी त्यांनी व्यावसायीक व व्यवस्थापकिय शिक्षणाला महत्व दिले.

पुण्या–मुंबई सारख्या शहरांमध्ये जे शिक्षण उपलब्ध नव्हते ते म्हणजे मॅनेजमेंट (एम.बी.ए.) कॉलेज १९६८ मधे सुरु झाले. व्यवस्थापनातील अभ्यासक्रमाची सुरुवात केली. मुळातच पारंपारिक अभ्यासक्रमा ऐवजी १९८३ मध्ये बी. वाय.के. महाविद्यालयात पुनर्रचित अभ्यासक्रम सुरु केला. सरांचा १९५८ ते १९७३ पर्यतचा कालखंड लक्षात घेतला, तर या कालावधित सर संस्थेचे प्राचार्य होते. या काळात स्वतःची सिध्दता करण्यासाठी त्यांनी विद्यापीठातील अधिकार मंडळे, अधिष्ठाता, व्यवस्थापन परिषद, विद्या परिषद, सिनेट व अभ्यास मंडळ या सर्वस्तरांवर १९६१ ते १९८३ पर्यत काम केले. मॅनेजमेंट सायन्समध्ये त्यांनी पी.एच.डी. पदवी संपादन केली.

सन १९७३ मध्ये सर गोखले एज्युकेशन संस्थेचे सचिव झाले. त्या काळात संस्थेवर काही कर्ज होते. त्यातून सरांनी संस्थेला बाहेर काढून आज संस्था पुर्ण अर्थाने स्वावलंबी झालेली आहे. व संस्था तेव्हा पासूनच प्रगतिपथावर कार्यरत आहे. सन १९७८ मध्ये वाणिज्य शाखेत संगणकाचे ज्ञान विद्यार्थांना उपलब्ध करुन दिले, लायब्ररी सायन्स, बीसीएस, बायोटेक या विषयांची सोय नाशिकच्या परिसरात उपलब्ध करुन दिली. विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र महिला महाविद्यालय काढून होम सायन्स, संगीतविशारद, फॅशनडिझायनिंग, टेक्सटाईल या सारखे विषय सूरु करुन अनेक विद्यार्थिनींना त्यात रोजगाराची संधी निर्माण केली. नाशिकची गरज लक्षात घेत वकिली व्यवसायासाठी लागणारे विधी महाविद्यालय, चार्टड अकाऊंटसाठी लागणारे कुशल मनुष्यबळ त्यांनी बी.वाय.के. महाविद्यालयाच्या रुपाने निर्माण केले.

नाशिक, नाशिक रोड, संगमनेर या परिसरात अनेक महाविद्यालये व शाळा नव्याने सुरु करुन महाविद्यालयांची सांख्यीकी व गुणवत्तापूर्ण संस्थेची वाढ होताना आपणास दिसून येते. इंजिनिअरिंग, फार्मसी, नर्सिंग महाविद्यालयेही सुरु केली. या महाविद्यालयात कमीत कमी शुल्कात विद्यार्थी व पालकांची शिक्षणाची सोय केली.

संस्थेने मागास व आदिवासी क्षेत्रात अतिशय उल्लेखनिय असे कार्य केले आहे. बोर्डी, कोसबाड, तलासरी, डहाणू, जव्हार व रायगडमधिल श्रीवर्धन या भागात शिक्षणाचे जाळे निर्माण केले. आश्रम शाळांच्या जोडीला इंग्रजी माध्यामाच्या शाळा त्यांनी सुरु केल्या. जेथे विद्यार्थी शुल्क भरु शकत नाही, तेथे त्यांनी मोफत शिक्षणाची सोय उपलब्ध करुन दिली. खरे तर गेल्या ३० वर्षात हजारो उद्योजक संस्थेतून निर्माण झाले आहेत.

प्रिं. टि.ए.कुलकर्णी मुळचे कोकणातील होते. ही आठवण ठेऊन संस्थेच्या चालकांनी कोकणातील आदिवासी व ग्रामिण भागात लक्ष केंद्रित करुन रायगड मधिल श्रीवर्धन येथे १९९८ ला कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सुरु केले. भारताला स्वतंत्र्य मिळून ५० वर्षे उलटली तरी येथे उच्च शिक्षण सुविधा नव्हती. ती या संस्थेने पुर्ण केली. या महाविद्यालयाची २० वर्षाची प्रगती पाहण्याची संधी मला श्रीवर्धन महाविद्यालयात काम करताना मिळाली. श्रीवर्धन येथिन शिक्षण रुपी इमारतीचा पायारुपी दगड होताना मला अनेक गोष्टी जवळून पाहता आल्या. श्रीवर्धन सेंटरला आता केजी टू पीजी पर्यतचे शिक्षण दिले जात आहे. व येथिल महाविद्यालयाच्या स्थापनेपासूनच संस्थेच्या दुरदृष्टीचा मला जवळून परिचय झाला आहे. आतापर्यत येथे प्राचार्य रोकडे सर, प्रचार्य एस. एस. गोसावी सर, प्राचार्य राम कुलकर्णी सर, प्राचार्य मनोहर मेश्राम सर अशा प्राचार्यासमवेत काम करताना बरच काही शिकायला मिळाले. आज असंख्य विद्यार्थी येथे पदवी शिक्षण घेऊन पुणे–मुंबईच नव्हे, तर अगदी अरबस्तान युरोप, अमेरिकेत काम करताना दिसून येत आहे. थोडक्यात म्हणजे गेल्या शंभर वर्षामध्ये य संस्थेची म्हणजेच शिक्षण क्षेत्राची मोठी भरभराट झाली आहे. संस्थेच्या या प्रगतीला व भरभराटीला माझ्या शतशः शुभेच्छा!